शनिवार, १२ डिसेंबर २०१५ प्रहार

# परिश्रम करा आणि निर्व्यसनी रहा.. यश तुमचेच!

## जिल्हा पोलीस अधीक्षक दत्तात्रय शिंदे यांचे प्रतिपादन : केर येथे विद्यापिठस्तरीय निवासी शिबीर संपन्न

▶दोडामार्ग (प्रतिनिधी)

यश मिळाले म्हणुन हुरळुन जाऊ नका आणि अपयशाने खचुन जाऊ नका. अपयश आले तर पुढे यश येणार आहे त्यासाठी भरपुर परिश्रम करा आणि महत्त्वाचे म्हणजे निर्व्यसनी रहा असे प्रतिपादन सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस अधिक्षक दत्तात्रय शिंदे यांनी केले.

मुंबई विद्यापिठस्तरीय निवासी शिबीर केर येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी सातव्या निरोप समारंभादिवशी एन. एस. एस. च्या स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी श्री. शिंदे यांच्यासमवेत केर गावचे सरपंच प्रेमानंद देसाई, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, कार्यक्रमप्रमुख प्रा. डॉ. दरेकर, प्रा. मोरे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य भाई परमेकर आदी उपस्थित होते.

केर गावात सात दिवस मुंबई विद्यापिठाच्या विद्यार्थ्यांनी साफसफाई, वनराई बंधारे, शोष खड्डे, वृक्षारोपण आदी श्रमदानाबरोबर पर्यावरण संवर्धनावर प्रबोधन केले. निवासी शिबीराच्या शेवटच्या दिवशी जिल्हा पोलीस अधिक्षक दत्तात्रय शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, आजची पिढी व्हॉटस् ॲप, फेसबुक आदी सोशल साईटचा अवास्तव वापर करत आहे. व्यसन म्हटल्यावर दारू, जुगार याकडे पाहिले जाते त्याचबरोबर आजची पिढी पाहता सोशल साईटचा होणार वापर व्यसनात येतो. श्रम, वेळ, पैसा हे मुलभुत स्त्रोत आहेत. या स्त्रोतामधील वेळ हा घटक महत्त्वाचा आहे. सोशल साईटच्या माध्यमातुन वेळ वाया घालवु नका. रचनात्मक अभ्यास करीत असताना आताच्या वयात जी किंमत तुम्ही वेळेला देणार आहात त्याच्या कितीतरी पट तुमची किंमत भविष्यात वाढणार आहे. त्यासाठी वेळेचे नियोजन करून परीश्रम करत निर्व्यसनी रहा. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. सोपान जाधव यांनी केले तर आभार प्रा. मोरे यांनी मानले.




एन. एस. एस. च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जिल्हा पोलीस अधिक्षक दत्तात्रय शिंदे सोबत अन्य (तेजस देसाई)

### केर गावाचे कौतुक

यावेळी श्री. शिंदे यांनी केर गावात विद्यापिठस्तरीय सात दिवशीय निवासी शिबीर संपन्न झाले हे पाहुन व उपस्थित विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेल्या प्रतिक्रीया ऐकुन गावाचे कौतुक केले. येथील सामाजिक परीस्थितीचा आढावा घेत अहमदनगर येथील हिवरेबाजार प्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्यात केर गाव आदर्श गाव म्हणुन नावारूपास येईल असा आशावाद व्यक्त केला.